**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. आजीमोद्दीन शहाबुद्दीन मुल्ला
९८७,कसबा,मुल्ला गल्ली, बार्शी,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
मुख्याध्यापक,
अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज,
बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८०/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१४.१२.२००५ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.१२.२००५ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.१.२००६ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. १८.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपीलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये माहिती १५ दिवसांत देण्याबाबत एकमत झाले.

अपीलकर्ता श्री.आजीमोद्दीन मुल्ला यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील मुदत बाहय आहे. तसेच त्यांना जोडपत्र 'अ' प्रमाणे यापूर्वीच माहिती मिळाली. असल्याचे सादर केलेल्या कागदपत्रांवरून दिसून येते. त्यामुळे त्यांची शास्तीची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १३.१.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

१. श्री. शरद चंद्रकांत मुरडे — अपीलकर्ते
तृप्ती निवास, सोळू रोड, धनंजय लॉजच्या
मागे, आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे
२. श्री. दिनेश कृष्णराव रंधवे
वारणा पॅलेस, वडगांव रस्ता, आळंदी
देवाची, ता. खेड, जि. पुणे
३. श्री. रामचंद्र तात्याबा पवार
रा. नेलेकर वाडा, आळंदी देवाची,
ता. खेड, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), नगरपालिका प्रशासन, विधान भवन, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद, आळंदी, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८२+ ६२३ + ६९२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.११.२००८ |
| ३ | उपस्थित | |

अपीलकर्ता : श्री. शरद चंद्रकांत मुरडे
तृप्ती निवास, सोळू रोड, धनंजय लॉजच्या
मागे, आळंदी देवाची, ता. खेड, जि. पुणे

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), नगरपालिका प्रशासन, विधान भवन, पुणे श्री. प्रकाश पाटील

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| २८२ / पुणे | ६.१०.२००६ | -- | २०.११.२००६ | ११.१२.२००६ |
| ६२३ / पुणे | ३०.१.२००६ | -- | २१.४.२००६ | २२.१२.२००६ |
| ६९२ / पुणे | ३.११.२००६ | १५.१.२००७ | १५.१२.२००६<br>५.१.२००७ | १५.१.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

**अपील क्र.२८२ / पुणे**

आपण दि. ६.१०.२००६ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती दिली नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद, आळंदी, जि. पुणे श्री. संजीव ओहोळ यांनी विहित मुदतीत उत्तर दिलेले नाही, असे नमूद करून अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), नगरपालिका प्रशासन, विधान भवन, पुणे यांनी अपील मान्य केले व माहिती अथवा योग्य उत्तर देण्यास जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगर परिषद यांना आदेश दिले. त्यानंतर दि. २२.१२.२००६ रोजी श्री. संजीव ओहोळ यांनी आपल्याला पत्र पाठविले व हव्या असलेल्या नेमक्या माहितीबाबत समक्ष येऊन चर्चा करावी, असे कळविले. माहितीबाबत आपण पुन्हा दि. २६.१२.२००६ रोजी श्री. ओहोळ यांना पत्र पाठविले. त्यानंतर दि. २०.१.२००७ रोजी श्री. ओहोळ यांनी त्रोटक माहिती पाठविली. संपूर्ण माहिती दहा दिवसांत देण्यात येईल, असे दि. ११.६.२००८ रोजी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी श्री. ओहोळ यांनी सांगितले. त्यानुसार माहिती मिळाली नाही. मूळ अर्जानुसार व अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, पुणे विभाग, यांच्या आदेशानंतरही, तसेच १० दिवसांत माहिती देण्याचे आयोगाच्या कार्यक्रमात कबूल करूनही श्री. ओहोळ यांनी जाणीवपूर्वक माहिती दिली नाही. दि. २०.६.२००८ पर्यंत श्री. ओहोळ आळंदी नगरपरिषदेत कार्यरत होते. त्या काळात माहितीची मागणी वारंवार करूनही त्यांनी माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक व अन्य कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. शरद चंद्रकांत पुरडे यांनी केली.

श्री. ओहोळ यांनी विहित मुदतीत माहिती देण्याबाबत कार्यवाही केली नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), नगरपालिका प्रशासन, विधान भवन, पुणे श्री. प्रकाश पाटील यांनी मान्य केले.

आयोगाने तीन वेळा सुनावणीची तारीख व माहिती देण्याबाबत अनेकदा संधी देऊनही तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद, आळंदी श्री. संजीव ओहोळ यांनी माहिती दिलेली नाही.

**अपील क्र. ६२३/ पुणे :**

लोकसहभागातून केलेल्या कामाबाबतची माहिती आपण दि. ३०.१.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितली. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आंळदी नगरपरिषद श्री. संजीव ओहोळ यांनी कोणतेही उत्तर दिले नाही, म्हणून दि. २१.४.२००६ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), नगरपालिका प्रशासन, विधान भवन, पुणे यांच्याकडे अपील केले. संबंधित काम लोकसहभागातून झाले असून त्यास तांत्रिक मान्यतादेखील देण्यात आलेली होती. मात्र नगर परिषदेच्या अभिलेखामध्ये शोध घेतला असता हे काम नगरपरिषदेने केल्याचे आढळून येत नाही, असे श्री. ओहोळ यांनी दि. २४.५.२००६ रोजीच्या पत्रान्वये आपल्याला कळविले. माहिती ८४ दिवस विलंबाने दिल्याचे अपिलीय प्राधिकारी यांच्या निकालपत्रात नमूद केले आहे. मात्र त्यावेळीही श्री. ओहोळ यांनी केलेले निवेदन योग्य नसल्याचे श्री. ओहोळ यांनी दि. १०.१२.२००७ च्या पत्रान्वये राज्य माहिती आयोगाला सादर केलेल्या अहवालावरून स्पष्ट होते. 'संबंधित अभिलेख नगर परिषद कार्यालयात शोधण्याचा युध्द पातळीवर प्रयत्न करण्यात आले, परंतु त्याबाबतचे कोणतेही अभिलेख आजपर्यंत उपलब्ध झालेले नाहीत. सदरच्या कामाची योग्य ती नोंद नगरपरिषदेच्या अभिलेखात करण्यासाठी आगामी सर्वसाधारण सभेपुढे हा विषय ठेवण्यांत आला आहे,' असे श्री. ओहोळ यांनी या पत्रात नमूद केले आहे. ८४ दिवसांच्या विलंबाबद्दल त्यांना शास्ती करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. दिनेश कृष्णराव रंधवे यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नोंदविली आहे.

**अपील क्र. ६९२/पुणे :**

रस्ता रुंदीकरण, अतिक्रमण इ. बाबतची माहिती आपण दि. ३.११.२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगर परिषद श्री. संजीव ओहोळ यांनी उत्तर दिले नाही. दि. १५.१२.२००६ रोजी अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), नगरपालिका प्रशासन, विधान भवन, पुणे यांच्याकडे अपील केले. परंतु अपील विहित नमुन्यात नसल्याचे आपल्याला कळविण्यात आल्यावरून दि. ५.१.२००७ रोजी पुन्हा अपील सादर केले. त्यानंतरही माहिती मिळाली नाही, असे अपीलकर्ता श्री. रामचंद्र तात्याबा पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात नमूद केले आहे. श्री. पवार यांना दि. १५.१.२००७ रोजी

मुद्देनिहाय सविस्तर माहिती देण्यात आली, त्याबाबत त्यांनी कार्यालयात येऊन समाधान व्यक्त केले, असे श्री. ओहोळ यांनी लेखी निवेदनात नमूद केल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निकालपत्रात म्हटले आहे. तसेच, श्री. ओहोळ यांनी दि. १०.१२.२००७ च्या पत्रान्वये आयोगाला तसे कळविले आहे. मात्र मूळ अर्जाला उत्तर देण्यास ४० दिवस विलंब झाला आहे, असे कागदपत्रांवरुन स्पष्ट होते. त्याबद्दल श्री. ओहोळ शास्तीस पात्र ठरतात.

दरम्यान दि. १५.१.२००७ रोजी श्री. ओहोळ यांनी मुद्देनिहाय माहिती दिल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांना लेखी कळविले. तथापि उभय बाजूंची निवेदने व सादर केलेली कागदपत्रे पाहता त्यांचा खुलासा समर्थनीय नाही. पुराव्यादाखल त्यांनी त्याबाबत कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. तसेच विद्यमान मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद श्री. पी. अे. वंजेरी व अन्य कर्मचारी यांनीही ते मान्य केलेले नाही.

दरम्यान श्री. ओहोळ यांची बदली बुलढाणा येथे झाली आहे. माहिती देण्याबाबत अनास्था, दिरंगाई व अपूर्ण माहिती यामुळे शास्ती व अन्य कारवाई का करू नये, याबाबत त्यांचा खुलासा सादर करण्यास अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, सामान्य प्रशासन नगरपालिका प्रशासन, विधान भवन, पुणे यांनी त्यांना कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपील क्र.२८२, अपील क्र.६२३ व अपील क्र.६९२ या तीनही अपिलांबाबत प्रत्येक प्रकरणी रू.२५०००/- दंड होण्याबाबत काही म्हणणे असल्यास आठ दिवसांत आयोगाला सादर करावे, असे अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), नगरपालिका प्रशासन, विधान भवन, पुणे श्री. प्रकाश पाटील यांनी दि. २७.११.२००८ च्या पत्रान्वये श्री. ओहोळ यांना कळविले.

'माझी आळंदी येथून बदली झाल्याने दि. २०.६.२००८ रोजी मी मुख्याधिकारी, नगर परिषद, आळंदी येथील चार्ज सोडताना राज्य माहिती आयोगाचे निर्देशानुसार उक्त अपील प्रकरणातील माहिती देणे आवश्यक असल्याची बाब सध्याचे मुख्याधिकारी यांचे निदर्शनास तोंडी स्वरूपात आणली होती. त्याचप्रमाणे सदर माहिती तक्रारदार यांना विहित मुदतीत माहिती देण्याबाबत आळंदी नगरपरिषदेचे सहाय्यक माहिती अधिकारी यांना लेखी आदेश दिलेले होते. हा अनुषंगिक पत्रव्यवहार आळंदी नगर परिषद कार्यालयात उपलब्ध आहे. माझी बदली झाल्यानंतरच्या ५ महिन्यांमध्ये अपीलकर्त्या नागरिकांना

आळंदी नगर पालिका मुख्याधिकाऱ्यांनी माहिती न देण्याचे प्रयोजन स्पष्ट होत नाही. त्याचप्रमाणे अपीलकर्ते यांनी आळंदी नगर परिषदेकडे माहिती मिळविण्यासाठी या ५ महिन्यांत काय प्रयत्न केले याची मला माहिती नाही. मी दि. २०.६.२००८ रोजी कार्यमुक्त झाल्यावरही नगर परिषद आळंदीच्या संबंधित कार्यालयीन कर्मचाऱ्यांना ही माहिती देणे गरजेचे आहे, याची आठवण करून दिली होती. त्यानंतर मला दिलेल्या निरोप समारंभातही ही बाब मी संबंधितांच्या निदर्शनास आणली होती. त्यामुळे सदर माहिती तक्रारदार यांना विहित मुदतीत देण्याचे काम सध्याचे आळंदी नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा माहिती अधिकारी यांची होती. परंतु असे असतानासुध्दा हेतूपुरस्पर आळंदी नगर परिषदेच्या संबंधितांनी तक्रारदार यांना माहिती दिली नाही. यास मी जबाबदार असू शकत नाही, असे श्री. ओहोळ यांनी दि. ६.१२.२००८ च्या पत्रान्वये केलेल्या खुलाशात म्हटले आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आंळदी नगरपरिषद श्री. पी.अे. वंजेरी यांनी श्री. शरद चंद्रकांत मुरडे यांना दि. ११.१२.२००८ च्या पत्रान्वये माहितीबाबत कळविले व श्री. दिनेश कृष्णराव रंधवे (अपील क्र.६२३) यांना दि. ११.६.२००८ च्या पत्रान्वये माहिती देण्यात आल्याचे कळविले.

अपील क्र.२८२ व ६२३ प्रमाणे यापूर्वीच्या काही अपिलांमध्येही माहिती देण्याबाबत श्री. ओहोळ यांनी कोणतीही मुदत पाळलेली नसल्याचे व योग्य कार्यवाही केली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. अपील क्र. १२३६/ पुणे मध्ये आयोगाने त्यांना रू. २५०००/- शास्तीही केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार करावयाच्या बंधनकारक कार्यवाहीबाबत श्री. संजीव ओहोळ यांची ही कार्यपध्दती शिस्तभंग करणारी व कारवाईस पात्र अशी आहे.

आयोगाच्या आदेश पुढील प्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील क्र. ६२३, २८२ व ६९२ मान्य करण्यात येत आहेत.

२. माहिती देण्याबाबत विहित मुदतीत कार्यवाही न केल्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद (सध्या मुख्याधिकारी, बुलढाणा नगरपरिषद, बुलढाणा ) श्री. संजीव ओहोळ यांना अपील क्र. २८२/पुणे मध्ये रू. २५,०००/-, अपील क्र. ६२३ / पुणे मध्ये ८४

दिवसांच्या विलंबाबद्दल (८४ x २५०) २१,०००/- , व अपील क्र. ६९२/पुणे मध्ये ४० दिवसांच्या विलंबाबद्दल ( ४० x २५० ) = रू. १०,०००/- अशी एकूण रू. ५६,०००/- शास्ती लावण्यात येत आहे. शास्तीची रक्कम श्री. संजीव ओहोळ यांच्या जानेवारी २०१०, फेब्रुवारी २०१०, मार्च २०१० व एप्रिल २०१० च्या अनुक्रमे फेब्रुवारी २०१०, मार्च २०१०, एप्रिल २०१० व मे २०१० मध्ये देय असलेल्या वेतनातून समान हप्त्यात कपात करून ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१) या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त, अमरावती विभाग यांनी करावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

४. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीबाबत श्री. संजीव ओहोळ यांची कृती नियमांचे पालन करणारी नाही. त्यामुळे अनियमितपणाबद्दल त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील ) नियम, १९७९ नुसार विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी कारवाई करावी व त्याबाबतचा अहवाल दि. २५.२.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

पुणे
दि. ०८.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**प्रत :** विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

डॉ. विजय रघुनाथ दिघे
डॉ. बापूजी साळुंखे नगर, १२.बी, खिंडवाडी,
ता. जि. सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, ओल्ड कस्टम, फोर्ट, मुंबई — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, ओल्ड कस्टम, फोर्ट, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८२ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता**

डॉ. विजय रघुनाथ दिघे
डॉ. बापूजी साळुंखे नगर, १२.बी, खिंडवाडी,
ता. जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

<u>विवेचन</u>

[illegible] १९८८ मध्ये दुय्यम निरीक्षक पदोन्नतीबाबत तत्कालीन सहाय्यक दुय्यम निरीक्षक (सेवा निवृत्त) श्री. राजेंद्रनाथ रामचंद्र आंताडे यांच्यावर अन्याय झाला. त्या संदर्भात दिलेली माहिती खोटी व

दिशाभूल करणारी आहे. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी श्री. औताडे यांच्या बाजूने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी मुख्य कार्यालयाने केलेली नाही. ही अंमलबजावणी करून श्री. औताडे यांना मानीव दिनांक देण्याचे आदेश राज्य उत्पादन शुल्क विभागाला द्यावेत. अशी मागणी अपीलकर्ता डॉ. विजय रघुनाथ दिघे यांनी लेखी व तोंडी केली.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यांस मूळ अर्जानुसार देय माहिती देण्यात आली आहे. 'श्री. औताडे यांना मुलाखतीस का बोलाविले नाही', 'उच्च न्यायालयात खोटे प्रतिज्ञापत्र का सादर केले', 'पदोन्नती नाकारण्याचे कारण काय', अशा स्वरूपाचे प्रश्न श्री. दिघे यांनी विचारले असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार अशी विचारणा करता येत नाही. ही 'माहिती' ठरत नाही. तसेच महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयार्थ येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

<u>**आदेश**</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १८.१.२०१०

(शिक्का: राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र — पुणे खंडपीठ)

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत.चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. समीर बंडू संघीमत्र — अपीलकर्ता
उंळाळकर होस्टेलसमोर, विद्यानगर,
ता. कराड, जि. सातारा

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक, सहकारी संस्था, कराड, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८३ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००९ |
| ३ | उपस्थित<br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा श्री. के.एन. जाधव<br>**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक, सहकारी संस्था, कराड, जि. सातारा तर्फे प्रतिनिधी श्री. बी.ए.बगले, सह. अधिकारी | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.९.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. समीर बंडू संघीमत्र यांनी मागितलेली सह्याद्री सहकारी बँक लि., कराड यांच्याकडील कर्ज खात्याचा उतारा वगळता अन्य माहिती विहित मुदतीत देण्यात आली. श्री. संघीमत्र

यांनी केलेल्या अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा उप निबंधक सहकारी संस्था, सातारा यांनी दिलेल्या आदेशानुसार कर्ज खात्याचा उतारा बँकेकडून मागविला, तथापि श्री. संघमित्र यांच्या कर्जाबाबत दिवाणी न्यायालयात दावा दाखल असल्याच्या कारणावरुन बँकेने उतारा नाकारला. त्यानंतर हा उतारा प्राप्त करून घेऊन श्री. संघमित्र यांना पाठविण्यात आला. त्यानंतर पुन्हा रजिस्टर्ड टपालाने कालच या उताऱ्याची प्रत पाठविली. आपल्या कार्यालयाच्या अभिलेखात नसलेली माहिती सहकारी बँकेकडून प्राप्त करून घेऊन श्री.संघमित्र यांना दिली, असे लेखी व तोंडी निवेदन जन माहिती अधिकारी उप निबंधक, सहकारी संस्था, कराड यांचे प्रतिनिधी श्री. बी. ए. बगले व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा श्री. के.एन. जाधव यांनी केले. ते लक्षात घेता माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १८.१.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.महादेव बापू दुधाने
मु.पो.खिंगर, ता.महाबळेश्वर, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कं.मर्यादित, विभागीय कार्यालय, वाई, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कं.मर्यादित, उपविभागीय कार्यालय, पांचगणी,
ता.महाबळेश्वर, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९२+२९८+२९९+३९५+३९६ /सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महादेव बापू दुधाने
मु.पो.खिंगर, ता.महाबळेश्वर, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य
विद्युत वितरण कं.मर्यादित, विभागीय कार्यालय, वाई, जि.सातारा श्री.ए.एम.शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्यादित, उपविभागीय कार्यालय, पांचगणी, ता.महाबळेश्वर, जि.सातारा श्री.एस.एस.बोंगाणे

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| २९२ | २३.४.२००७ | २७.६.२००८ | १७.१०.२००७ | २०.५.२००८ |
| २९८ | २३.४.२००७ | २७.६.२००८ | १७.१०.२००७ | २०.५.२००८ |
| ३९५ | २३.४.२००७ | २०.५.२००८ | १७.१०.२००७ | ७.५.२००८ |
| ३९६ | २३.४.२००७ | ७.११.२००७ व २०.५.२००८ | १७.१०.२००७ | ७.५.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | | | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण मागितलेल्या माहितीबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्यादित, उपविभागीय कार्यालय, वाई, जि.सातारा श्री.एस.डी.राजदीप यांनी टाळाटाळ केली. सुमारे ४००० रूपये एवढे अवास्तव शुल्क कळविले. ते भरूनही माहिती न देता, दिल्याचे भासविले. गावातील व्यक्तीला ८-८ वर्षे वीज जोडणी मिळत नाही व बाहेरील व्यक्तींना जमीन खरेदी केल्यानंतर एका महिन्यात जोडणी दिली जाते, अशा असंख्य शेतकऱ्यांच्या तक्रारी असल्यामुळे आपण माहिती मागितली आहे. असे काम करणाऱ्या अधिकाऱ्याला पदोन्नती देण्यात आली आहे, असे निवेदन अपीलकर्ता श्री.महादेव बापू दुधाने यांनी केले.

संबंधित संचिका पाहता माहिती देण्यात आल्याची नोंद दिसते. परंतु ही माहिती आपल्याला मिळाली नसल्याचे श्री.दुधाने यांचे म्हणणे असून प्रत्यक्षात माहिती त्यांना मिळाली की नाही हे कळून येत नाही. याबाबत विचारणा केली असता श्री.राजदीप यांनी माहिती दिल्याचे कळविले. मात्र अवाजवी शुल्काचे कोणतेही स्पष्टीकरण त्यांनी दिलेले नाही. तसेच माहिती न मिळाल्याची

तक्रार श्री.दुधाने यांनी अपिलात केल्यामुळे त्यावेळचे अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्यादित, विभागीय कार्यालय, वाई, जि.सातारा श्री.फारूख मोहम्मद युसुफ यांनी त्यावेळचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्यादित, उपविभागीय कार्यालय, पांचगणी उपविभाग, जि.सातारा श्री.एस.डी.राजदीप, यांना १५ दिवसात माहिती देण्याचे आदेश दिले व त्यानुसार श्री.दुधाने यांना माहिती देण्यात आली, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्यादित, उपविभागीय कार्यालय, पांचगणी उपविभाग, जि.सातारा श्री.एस.एस.बोंगाणे यांनी केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्यादित, उपविभागीय कार्यालय, पांचगणी उपविभाग, जि.सातारा श्री.एस.डी.राजदीप यांनी माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा व शुल्काबाबतचा खुलासा तीन दिवसात आयोगाला सादर करावा, त्यानंतर शुल्काची अवाजवी रक्कम व्याजासह परत करण्याच्या व श्री.राजदीप यांच्यावरील कारवाईच्या अपीलकर्त्याच्या मागणीबाबत निर्णय घेण्यात येईल, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्यादित, उपविभागीय कार्यालय, पांचगणी उपविभाग, जि.सातारा यांनी दि.६.२.२००९ च्या पत्रान्वये श्री.राजदीप यांना आयोगाचे आदेश कळविले. त्यानुसार श्री.राजदीप यांनी दि.७.२.२००९ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. श्री.दुधाने यांच्याकडून वाजवी शुल्क आकारून विहित मुदतीत त्यांना माहिती देण्यात आली. जावक बारनिशीत त्याची नोंद आहे, असे नमूद करून श्री.राजदीप यांनी दिलेल्या माहितीची व जावक बारनिशीतील नोंदीची छायाप्रत सोबत जोडली आहे. श्री.दुधाने यांनी माहिती न मिळाल्याची अथवा ती अपुरी असल्याची तक्रार त्वरित न करता पांचगणी येथून आपली बदली झाल्यानंतर केली. त्यानंतर तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्यादित, उपविभागीय कार्यालय, पांचगणी उपविभाग, जि.सातारा यांनी माहिती दिली, असे श्री.राजदीप

यांनी या खुलाशात म्हटले आहे. मात्र संबंधित माहितीसाठी आकारलेले शुल्क वाजवी कसे याचा खुलासा त्यांनी केलेला नाही. दिलेल्या माहितीच्या म्हणून त्यांनी सादर केलेल्या छायांकित प्रती नेहमीच्या आकाराने विचार करता जास्तीत जास्त २५ पृष्ठाच्या म्हणजे ५० ते ६० रुपये शुल्काच्या ठरतात. या स्थितीत रू.४०००/- शुल्क कसे आकारले, याचा खुलासा त्यांनी त्वरित करणे आवश्यक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत तरतुदीप्रमाणे आकारणी न करता अवाजवी शुल्क आकारले असल्यास श्री.राजदीप यांनी ते अपीलकर्ता यांना सव्याज परत करावे लागेल.

इतर अपिले व्यक्तिशः श्री.राजदीप यांच्याबद्दल असल्याचे कागदपत्रांवरून स्पष्ट होते. अपील क्र.२९२ व २९८ मध्य असलेली मागणी व त्यात श्री.राजदीप यांच्या संदर्भात श्री.दुधाने यांनी केलेले निवेदन याचीच पुनरावृत्ती या अपिलांमध्ये आहे. त्यामुळे त्यांचा समावेश वरील दोन अपिलांच्या विचारात अंतर्भूत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

(२) आकारलेल्या शुल्काबाबत खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्यादित, उपविभागीय कार्यालय, पांचगणी उपविभाग, जि.सातारा यांनी दि.१५.२.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

(३) अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्यादित, विभागीय कार्यालय, वाई, जि.सातारा यांनी शुल्क आकारणीबाबत तपासणी करावी व जादा रक्कम आकारली असल्यास व्यक्तिशः श्री.एस.डी.राजदीप यांच्याकडून वसूल करून अपीलकर्त्यास परत करावी व त्याचा अहवाल दि.१५.२.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि.२८.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधाभवासमोर, पुणे ४११ ००१

अरुण शिवराम कांबळे
मु.पो.नरवाड, ता. मिरज,
जिल्हा सांगली ..... **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गटविकास अधिकारी,
पंचायत समिती मिरज, जिल्हा सांगली ..... **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत नरवाड, ता.मिरज,
जिल्हा सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०/२०१० सांगली |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक ७/१०/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक १३/११/२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** भारत निर्माण जल पाईप लाईनच्या कामासंदर्भात एकूण ७ मुद्दे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अरुण शिवराम कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत आवश्यक शुल्क (रुपये २०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेले अपील दखलपात्र ठरत नाही. तथापि अपिलीय प्राधिकारी तथा गट

विकास अधिकारी, पंचायत समिती, मिरज, यांनी प्रथम अपिलात दिलेल्या आदेशाच्या कार्यवाहीबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

१. अपील निकाली.

२. अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मिरज, यांनी प्रथम अपिलात दिलेल्या आदेशाच्या कार्यवाहीबाबतचा अहवाल दि. ३०.१.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठवावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. १९-०१-२०१०.

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. नारायण हरीभाऊ मगदूम — अपीलकता
मु.पो.चिखली, ता. कागल, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, कागल ता. कागल, जि. कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत चिखली, ता. कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०७ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. नारायण हरीभाऊ मगदूम
मु.पो.चिखली, ता. कागल, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा — गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, कागल, ता. कागल, जि. कोल्हापूर तर्फे प्रतिनिधी श्री. आर. बी. जंगम, विस्तार अधिकारी

**जन माहिती अधिकारी** तथा — ग्रामसेवक, ग्रामपंचायत चिखली, ता. कागल, जि.कोल्हापूर श्री. एम. वाय. मगदूम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १४.३.२००८ |

| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

शेजाऱ्याने बांधलेल्या हौदातून पाझरणाऱ्या पाण्यामुळे होत असलेल्या त्रासाबाबत दिलेल्या तक्रारीवरील माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत, चिखली, ता. कागल यांनी दिली नाही. आपल्याला व आपल्या मुलाला दमदाटीचा प्रयत्न केला. बनावट कागदपत्रे तयार करुन माहिती म्हणून देऊन फसवणूक केली. अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी (वर्ग-१), पंचायत समिती, कागल यांनी त्याची दखल घेतली नाही. म्हणून संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. नारायण हरीभाऊ मगदूम यांनी केली.

श्री. मगदूम यांनी दि. २०.११.२००७ रोजी अर्ज केला. त्याला दि. १.१२.२००७ रोजी उत्तर दिले व दि. १०.१२.२००७ रोजी केलेल्या अर्जावर दि. ८.१.२००८ रोजी उत्तर देऊन माहिती दिली. तसेच श्री. मगदूम यांच्या मूळ तक्रारीवर ग्रामपंचायत सभेत विचार विनिमय करुन प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली व त्याचीही माहिती श्री. मगदूम यांना दिली. बनावट कागदपत्रे अथवा खोटी माहिती दिलेली नाही. तसेच दमदाटीचा आरोप निराधार असल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत चिखली श्री. आर.वाय. नुल्ले यांचे म्हणणे आहे, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, चिखली श्री. एम. वाय. मगदूम यांनी केले.

श्री. मगदूम यांची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून त्या संदर्भातील माहिती देण्यात आल्याचे कागदपत्रांवरुन दिसते. मूळ अर्जातील तारखेबाबत खाडाखोड असल्याचे अपीलकर्त्याने निदर्शनास आणले असून संबंधित लिपिकाचा खुलासा ३ दिवसांत आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार लिपिक श्री. तुकाराम केरबा काटकर यांनी दि.१९.१२.२००८ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. ग्राम पंचायतीने अपीलकर्त्याचे शेजारी श्री. विजय सखाराम मगदूम यांना दिलेल्या नोटिशीत दि. ५.९.२००७ ऐवजी

दि.१४.९.२००० अशी तारीख आपल्याकडून चुकून पडली असल्याचे त्यांनी नमूद केले आहे ते व अन्य कागदपत्रे विचारात घेता बनावट माहिती दिली असल्याचे निष्पन्न होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ०८.१.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुनिलकुमार नामदेव ठोंबरे — अपीलकर्ता
कच्छी निवास, लोणंद, ता. खंडाळा,
जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,\ (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, विधान भवन, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगरपरिषद, ता. महाबळेश्वर, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००९ |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,\ (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, विधान भवन, पुणे-१ श्री. एस.एस. गोसावी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगरपरिषद, ता. महाबळेश्वर, जि. सातारा तर्फे प्रतिनिधी श्री. किशोर कांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.१०.२००८, ६.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.१.२००८ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुनिलकुमार नामदेव ठोंबरे यांनी मागितलेल्या माहितीतील हॉटेलची यादी वगैरे तपशील दिला. परंतु मुद्दा क्र. १ ते ३ ची माहिती विस्तृत असून नगरपरिषदेला शॉप अॅक्ट लागू नसल्यामुळे अशी माहिती नगरपरिषदेकडे उपलब्ध नाही, असे त्यांना विहित मुदतीत कळविले. उपलब्ध माहिती देण्यात आली आहे. श्री. ठोंबरे यांनी प्रथम अपील न करता थेट राज्य माहिती आयोगाकडे अपील केले, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगरपरिषद श्री. किशोर बोर्डे यांनी केले. संबंधित माहिती तहसील कार्यालयाकडून उपलब्ध होऊ शकते, असेही त्यांनी नमूद केले. अपीलकर्त्यांचा अर्ज संबंधित कार्यालयाकडे वर्ग करून जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, महाबळेश्वर नगरपरिषद यांनी अपीलकर्त्यास त्वरित तसे कळविणे आवश्यक होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १८.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.काशिनाथ त्रिंबक साने
१११, शुक्रवार पेठ, गणेश अपार्टमेंट ब-२,
बदामी हौदाजवळ, पुणे-२ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

१) **जन माहिती अधिकारी तथा** पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य मुंबई-३२
२) **जन माहिती अधिकारी तथा** अपर पोलीस महासंचालक,
गुन्हे अन्वेषण विभाग,मध्यवर्ती इमारत, पुणे-१
३) **जन माहिती अधिकारी तथा** कक्ष अधिकारी,
गृह विभाग (पोल १ व ४), मंत्रालय, मुंबई-३२
४) **जन माहिती अधिकारी तथा** अपर मुख्य सचिव,
गृह विभाग, ५ वा मजला, मंत्रालय, मुंबई-३२
५) **जन माहिती अधिकारी तथा** मुख्य सचिव कार्यालय,
मंत्रालय, मुंबई-३२
६) **जन माहिती अधिकारी तथा** प्रधान सचिव,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ **उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०९६/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२७.०९.२००६ |
| ३ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छाया प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.काशिनाथ त्रिंबक साने यांनी मूळ माहिती मागणीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, (म.रा.) मध्यवर्ती इमारत, पुणे-१ व

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अग्रेषित केला असून उपरोक्त नमूद ६ अधिकाऱ्यांना प्रतिलिपी केला आहे. तसेच सदर अधिकाऱ्यांचाच उल्लेख अपिलीय प्राधिकारी म्हणून राज्य माहिती आयोगाकडील अपिलामध्ये केला आहे व या अपिलाची प्रत सदर ६ अधिकाऱ्यांना प्रतिलिपी केली आहे. मूळ माहिती अर्ज जन माहिती अधिकारी निहाय स्वतंत्रपणे सादर करणे तद्नंतर प्रथम अपील संबंधित अपिलीय प्राधिकारी यांचेकडे करणे व माहितीचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ नुसार विहित पध्दतीने सादर करणे आवश्यक होते.

श्री.साने यांचे अपील हे केवळ निवेदन स्वरुपात असून त्यांच्या अर्जाविषयी आयोगाने यापूर्वीच अपील क्र.५४१+१०३१/पुणे मध्ये दि.२३.०६.२००८ रोजी आदेश पारित केले आहेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. : ३०.०१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर कोंडिबा चिकणे
मु.पो.नित्रळ, ता.जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, सातारा
तहसील कार्यालय, सातारा, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, सातारा, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१४ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, सातारा
तहसील कार्यालय, सातारा, जि.पुणे श्री.पी.आर.कोथेरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.१२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर कोंडिबा चिकणे
मु.पो.नित्रळ, ता.जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, सातारा
तहसील कार्यालय, सातारा, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, सातारा, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१४ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, सातारा
तहसील कार्यालय, सातारा, जि.पुणे श्री.पी.आर.कोथेरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.१२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

<u>**विवेचन**</u>

राज्य माहिती आयोगाने दि.२१.८२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सन १९४० ते १९५२ या काळातील मौजे नित्रळ, ता.जि.सातारा येथील पिकपहाणीसह ७/१२ उतारा मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.शंकर कोंडिबा चिकणे यांनी केली होती. परंतु या काळातील संपूर्ण गावाचेच उतारे उपलब्ध नाहीत, असे वारंवार शोध घेतला असता आढळून आले. सन १९५२ पासून अशा उताऱ्यांना या गावी सुरूवात झाल्याचे दिसते. त्यामुळे श्री.चिकणे यांना माहिती देता येत नसल्याचे उपलब्ध अभिलेख दाखवूनही वेळोवेळी स्पष्ट केलेले आहे. ते मान्य असून तक्रार नसल्याचे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या स्वाक्षरीने 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, सातारा, तहसील कार्यालय, सातारा श्री.पी.आर.कोथेरे यांनी केले.

संबंधित नोंदीबाबत क,ड,ई पत्रकाचा शोध घेऊन त्याची प्रत अपीलकर्त्यास द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

<u>**आदेश**</u>

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, सातारा, तहसील कार्यालय, सातारा यांनी दि१०.२.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि.२२.१.२०१०**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिलीस सिताराम देशपांडे : अपीलकर्ता
रा.मालोजीनगर, ता.फलटण, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन विभाग), पुणे विभाग, पुणे : उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, फलटण नगरपरिषद,फलटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. दिलीस सिताराम देशपांडे रा.मालोजीनगर, ता.फलटण, जि.सातारा |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | उप आयुक्त (सामान्य प्रशासन विभाग), पुणे विभाग, पुणे श्री. एस.एस.गोसावी |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | मुख्याधिकारी, फलटण नगरपरिषद,फलटण, जि. सातारा श्री. डी. के.नलवडे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.१०.२००६ |
| ८ | माहिती मागणीचा मूळ अर्ज (जोडपत्र-अ) ची प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. २१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २१.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण दि. २५.८.२००५ रोजी केलेल्या अर्जानुसार पूर्ण माहिती दिली नाही. माहिती निःशुल्क दिली, परंतु मुद्दा क्र.४ ची माहिती दोन वर्षांनी व मुद्दा क्र.५ ची माहिती असंबध्द देण्यात आली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. दिलीप सिताराम देशपांडे यांनी केली.

श्री. देशपांडे यांनी आपला मूळ अर्ज दि. २५.८.२००५ चा असल्याचे राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व अन्य पत्रव्यवहारात म्हटले आहे. प्रत्यक्षात त्यांचा अर्ज दि.२५.८.२००६ रोजीचा असल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्याधिकारी, नगरपरिषद, फलटण यांनी अर्जाच्या प्रतीसह नमूद केले. माहिती विहित मुदतीत देण्यात आली आहे. मुद्दा क्र.४ माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत येत नाही. म्हणून त्यावर भाष्य केलेले नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्याधिकारी, नगरपरिषद, फलटण श्री. डी. के.नलवडे यांनी केले. श्री. देशपांडे यांच्या अपिलातील मुद्दयांबाबत श्री. नलवडे यांना मुद्देनिहाय तपशीलवार निवेदन दि. २१.८.२००८ च्या पत्रान्वये सादर केले, त्याची प्रत सोबत जोडली आहे.

हे निवेदन लक्षात घेता श्री. देशपांडे यांच्या प्रतिपादनातील वस्तुस्थिती स्पष्ट होते. अशा स्थितीत कार्यवाहीची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नसल्याची व वस्तुस्थितीशी विसंगत मुद्दे न मांडण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

तथापि अपुऱ्या कागदपत्रांच्या प्रती मिळण्याची, मूळ अर्जात नसलेली मागणी श्री. देशपांडे यांनी सुनावणी दरम्यान केली, ती मान्य करुन आयोगाने जन माहिती अधिकाऱ्यांना त्याबाबत निदेश दिले. त्यानुसार नगरपरिषदेच्या अभिलेखातील कागदपत्रांच्या छायांकित प्रती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, फलटण श्री. डी. के.नलवडे यांनी दि. २७.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १८.१.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्रीमती शकुंतला अंकुश सावंत — **अपीलकर्ता**
द्वारा: श्री. राजाराम शंकर शेलार
जयविजय हौसिंग सोसायटी, शाहूपुरी, सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप सचिव, — **उत्तरवादी**
सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

**जन माहिती अधिकारी तथा** अवर सचिव,
सामाजिक न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **३३/२०१०/ सातारा** |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** अनुसूचित जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या आश्रमशाळांना मान्यता देणेसंदर्भातील माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्त्या श्रीमती शकुंतला अंकुश सावंत यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत, तसेच त्यांनी सादर केलेल्या अन्य कागदपत्रांवरुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले असल्याचे दिसून येत नाही, सबब, त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपीलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ — शिक्का)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७-०१-२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

डॉ. विक्रांत सदाशिव लाटे — अपीलकर्ता
मु.पो.उंब्रज, ता. कराड, जि. सातारा

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, — उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या.,
उपविभाग उंब्रज, जि. सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या., उपविभाग उंब्रज, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३५ + २३६ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.१.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — डॉ. विक्रांत सदाशिव लाटे
मु.पो.उंब्रज, ता. कराड, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा — सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या.,
उपविभाग उंब्रज, जि. सातारा
श्री. दाजीराम गणपती कुंभार

**जन माहिती अधिकारी** तथा — कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या., उपविभाग उंब्रज, जि. सातारा
श्री. सुरेंद्र राजेंद्र भुतकर

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ३३५/सातारा | १९.१२.२००७ | ३.१.२००८ | २८.१.२००८ | २२.२.२००८ |
| २३६/सातारा | ११.६.२००७ | ६.७.२००७ | १.८.२००७ | २४.८.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्याला वीज-जोडणीसाठी विद्युत-लोकपाल यांच्याकडे धाव घ्यावी लागली. कोटेशननुसार काम झाले नाही, त्यामुळे रक्कम जादा आकारली गेली. ती परत मिळावी. चार टप्प्यांमध्ये व विसंगत माहिती देण्यात आली. सर्व इमारतींची प्रत्यक्ष पाहणी करून माहिती दिली पाहिजे, असे प्रतिपादन अपीलकर्ता डॉ. विक्रांत सदाशिव लाटे यांनी केले.

मूळ अर्जानुसार अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती विहित मुदतीत दिली. त्यानंतर अपीलकर्त्यास बरोबर घेऊन प्रत्यक्ष पाहणी करून विद्युत-वाहिनीजवळ असणाऱ्या ३५० इमारतींची माहिती दिली. अंदाजपत्रकाप्रमाणे बनछडी केबल वापरता येत नसल्यामुळे वेगवेगळ्या केबल वापरल्या. ऊर्वरित रकमेचा धनादेश विद्युत निरीक्षकाकरवी द्यावयाचा राहिला आहे, हा सर्व भाग प्रशासकीय कार्यवाहीचा असून तोही पार पाडला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या., उंब्रज श्री. सुरेंद्र राजेंद्र भुतकर यांनी केले.

वीज जोडणीसाठी आवश्यक कागदपत्रांची माहिती वीज अर्जाच्या मागील बाजूला दिलेली आहे. अं-१ अशी तीन पत्रके असून त्यामध्ये नमूद असलेल्या कागदपत्रांच्या यादीत फरक आहे, ही अपीलकर्त्यांची तक्रार रास्त आहे. तथापि पूर्वीपासून अशीच प्रपत्रके आहेत. मात्र डॉ. लाटे यांना आवश्यक ना हरकत दाखल्याबाबत नेमकी माहिती देण्यात आली, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या., उपविभाग उंब्रज श्री. दाजीराम गणपती कुंभार यांनी नमूद केले.

अशा प्रकारे इमारतींची पाहणी करुन प्रशासकीय कार्यवाही करून माहिती देण्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये करता येणार नाही. अपीलकर्ता यांना विद्युत निरीक्षकाकडून द्यावयाच्या राहिलेल्या परताव्याच्या रक्कमेबाबत विलंब झाला असल्यास त्याच्या कारणांची व पूर्ततेबाबतच्या कार्यवाहीची माहिती लेखी स्वरूपात अपीलकर्त्यास देणे आवश्यक आहे. तसेच तीन वेगवेगळी प्रपत्रे असल्यास नागरिकांचा संभ्रम होऊ शकतो, हे लक्षात घेता नेमके प्रमाणभूत मानले जाणारे प्रपत्र कोणते, याची माहिती अपीलकर्त्यासच नव्हे, तर एकूण सर्व नागरिकांसाठी जाहीर

केली जाणे आवश्यक आहे. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या., उपविभाग उंब्रज श्री. दाजीराम गणपती कुंभार यांनी त्यानुसार कार्यवाही करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपिल निकाली काढण्यात येत आहेत.

२. आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे, ही गंभीर बाब असून अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या., उपविभाग, उंब्रज श्री. दाजीराम गणपती कुंभार यांनी दि. १५.२.२०१० पर्यंत विलंबाबाबतच्या अहवाल आयोगास सादर करावा, अन्यथा ते पुढील कारवाईस पात्र ठरतील.

पुणे
दि. ६८.१.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अरविंद नारायण मुळ्ये
५०१/अ, मंगळवार पेठ, २१, चिपळूणकर बाग, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अरविंद नारायण मुळ्ये
५०१/अ, मंगळवार पेठ, २१, चिंपळूणकर बाग, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे श्री.प्रकाश पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा श्री.सतीश कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.८.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.३.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.५.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी नगरपरिषदेने खर्चिक व अनैसर्गिक पर्याय निवडला. नैसर्गिक ओढ्याकाठचा ओहोळ गायब होण्याच्या प्रकाराकडे दुर्लक्ष केले, काम सुरू होण्याचा आदेश नसतानाच काम सुरू केले. पाणी काढण्यासाठी काढलेल्या तात्पुरत्या चरांमध्येच पुढे गटाराचे काम सुरू करण्यात आले. आपल्या दुकानासमोर चर खोदण्यामागे पाणी काढण्याचा उद्देश होता, हे उत्तर खोटे आहे. या संदर्भात मागितलेली माहिती अपूर्ण व खोटी दिली. माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांनी देऊनही ११ महिने माहिती दिली नाही. त्याबद्दल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.अरविंद नारायण मुळ्ये यांनी केली.

श्री.मुळ्ये यांनी मूळ अर्जात प्रशासकीय कार्यवाहीविषयीचे अनेक मुद्दे उपस्थित केले आहेत. तथापि सर्व मुद्दयांच्या संदर्भातील माहिती दिली आहे. नगरपरिषदेच्या व सिटी सर्व्हेच्या नकाशात कोठेही नाले नसल्यामुळे त्याची माहिती दिलेली नाही, असे निवेदन जन माहित अधिकारी तथा मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा श्री.सतीश कुलकर्णी यांनी केले.

प्रशासकीय कामाच्या अथवा आराखड्याच्या संदर्भात श्री.मुळ्ये यांच्या तक्रारी असल्यास त्यासाठी स्वतंत्र अपील करावे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे श्री.प्रकाश पाटील यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने पाहता श्री.मुळ्ये यांच्या मूळ अर्जातील व अन्य निवेदनातील बहुसंख्य मुद्दे माहितीपेक्षा प्रशासकीय कार्यवाहीविषयक आक्षेपांचे व अपेक्षांचे आहेत. नेमकेपणाने माहितीबाबतचे पत्र अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना द्यावे व त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी आठ दिवसात माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. सुनिल शरणप्पा माने
१२९, बुधवार पेठ, मिलिंदनगर, सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
विक्रीकर अधीक्षक,
विक्रीकर भवन, होडगी रोड, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
व्यवसाय कर अधिकारी,
विक्रीकर भवन, होडगी रोड, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३७/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.४.६.२००५ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.६.२००५ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.९.२००५ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.३.२००६ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** श्री. निजलिंगप्पा महादेव इंगळे यांनी श्री. सुनिल शरणप्पा माने यांच्या पिठाच्या गिरणीबाबत केलेल्या तक्रारीच्या व त्यावर केलेल्या कार्यवाहीच्या प्रती. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुनिल शरणप्पा माने यांनी जन माहिती अधिकारी तथा व्यवसाय कर अधिकारी , सोलापूर यांच्याकडे मागितलेली माहिती प्राप्त न झाल्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. १७.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

श्री. माने व श्री. इंगळे यांच्यात गेल्या काही वर्षापासून वाद सुरू असून त्या अनुषंगाने उभय बाजू सातत्याने विविध पातळयांवर तक्रारी अर्ज दावे-प्रतिदावे आदी करीत असतात. आयोगाने यापुर्वी अपील क्र. २१९ व २२० मध्ये यांची दखल घेतली असून प्रस्तुतचे अपीलही त्याच स्वरूपाचे आहे.

श्री. माने यांनी केलेले अपील हे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ अन्वये केलेले आहे. या अपिलाची सुनावणी उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि. ३.३.२००६ रोजी घेऊन दि. २२.३.२००६ अन्वये आदेशही दिले आहेत. त्यामुळे सबब सदर अपिलावर राज्य माहिती आयोगाव्दारा पुन्हा कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २७.१ .२०१०**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ. *